# पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ७०५/२०१३

सन २०१३ च्या प्रथमार्धात घेण्यात येणा-या व्दितीय व तृतीय वर्ष वाणिज्य परीक्षेच्या प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा दिनांक २५ एप्रिल, २०१३ ते दिनांक १५ मे, २०१३ या कालावधीत आयोजित करण्याचा निर्णय अधिकार मंडळाने घेतला आहे. सदर प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षेसाठी बहि:स्थ परिक्षकांच्या नेमणूका पुणे विद्यापीठामार्फत करण्यात आलेल्या आहेत. परंतु सदर बहि:स्थ परीक्षक उपलब्ध न झाल्यास आपल्या महाविद्यालयाच्या शेजारील महाविद्यालयातील मान्यताप्राप्त विषय शिक्षकाची बहि:स्थ परिक्षक म्हणून नियुक्ती मा. प्राचार्यांनी करावी व परीक्षा सुरळीत पार पाडाव्यात.

जर शेजारील महाविद्यालयातील मान्यताप्राप्त शिक्षक बहि:स्थ परीक्षक म्हणून उपलब्ध न झाल्यास मा.प्राचार्यांनी विशेष बाब म्हणून त्याच महाविद्यालयातील विषय शिक्षकास बहि:स्थ परीक्षक नेमावे व परीक्षा दिलेल्या मुदतीत सुरळीत पार पाडाव्यात.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सदरच्या प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा दिलेल्या ठराविक मुदतीत घेऊन विद्यार्थ्यांचे गुण त्वरित विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे पाठवावेत.

**प्रभारी परीक्षा नियंत्रक**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७. )
जावक क्र. परीक्षा/वाणिज्य/१०७ )
दिनांक : १८ एप्रिल, २०१३ )